दि. 19/12/2022

प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतूरचंद कला, विज्ञान

ववाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करण्यात येतो की, सोमवार दि. १९ डिसेंबर, २०२२ रोजी आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाव्दारें "**राष्ट्रीय अल्पसंख्यांक दिन**" साजरा करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे व्याख्याते म्हणून प्रा. राजू पांडे हे उपस्थित होते. तर कर्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख व विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. भगवान माळी सर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या वेळी व्यासपीठावर राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर , राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. विलास कर्डीले सर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक, डॉ. चंद्रकांत कांबळे सर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक, डॉ. निरंजन शहा सर उपस्थितीत होते. विद्यार्थांना प्रा. राजू पांडे यांनी "**भारतीय अल्पसंख्यांकाचे हक्क आणि सध्यस्थिती**" या विषयावर विद्यार्थांना मार्गदर्शन केले. या व्याख्यानाचा प्रारंभ सकाळी ११:०० वा. झाला.

या वेळी प्रा. राजू पांडे सर म्हणाले की, अल्पसंख्याकांच्या हक्क हा विषय अतिशय महत्वाचा आणि सध्याच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील, गुंतागुंतीचा आहे. समकालीन जगाचा विचर केला तर या विषयाला आंतरराष्ट्रीय परिमाण लाभलेले आहे. परंतु जगामध्ये अल्पसंख्यांक हा शब्द धर्म, भाषा, वंश, प्रदेश या अनुषंगाने वापरला जातो. त्यांच्या अधिकाराचे संरक्षण होणे महत्वाचे आहे. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धा मध्ये हा प्रश्न मानवी हक्कांच्या आग्रक्रमामुळे पाठीमागे पडलेला दिसून येतो. मात्र अल्पसंख्यांकाच्या प्रश्न विषयी आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघाने १८ डिसेंबर १९९२ रोजी अल्पसंख्याकांच्या हक्कचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. म्हणून आजचा दिवस हा अल्पसंख्यांक दिन म्हणून साजरा केला जातो.

परंतु आज जग हे टोकदार अस्मितावर उभे आहे. त्याला जागतिक महासत्ता सुद्धा अपवाद नाहीत. आतला आणि बाहेरचा हा वाद रोज नव्याने जन्म घेतो आहे. त्यामुळे हा प्रश्न जगाच्या आणि भारताच्या दृष्टीने गंभीर आणि चिंतेचा आहे. भारत हा खुल्या विचारानाचा देश आहे. या देशात कायम विषमता विरोधी समतावादी विचारप्रवाह राहिलेला आहे. त्यामुळे भारतात

जगातील सर्व प्रमुख धर्माचे अस्तित्व राहिलेले आहे. त्यामुळे जगाला भारताची ओळख हि बहुभाषिक, बहुसंस्कुतिक, बहुधार्मिक आहे. भारत हा असा विविधतेने नटलेला देश आहे.

या देशामध्ये जात, धर्म, पंथ, सांप्रदाय, भाषा, प्रांत, वेश-भूषा अशा अनेक विभन्नता आहे. तरीही भारत एक राष्ट्र आहे. कारण भारत नावाचे राष्ट्र उभे करण्यामध्ये अल्पसंख्यांक समाजाचे मोठे योगदान आहे. ज्यावेळी संविधान सभेमध्ये अल्पसंख्याकांच्या हक्कांचा प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळी अल्पसंख्याकांना हक्क देण्याविषयी अतिशय गंभीर चर्चा झाली. त्यामध्ये काही सदस्यांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. त्या मागणीला सरदार वल्लभभाई पटेल यांनी विरोध दर्शवला. परंतु अल्पसंख्याकांच्या हक्कांचा ठराव सुद्धा सरदार वल्लभभाई पटेल यांनी मांडला. भारतीय संविधाना मध्ये अल्पसंख्याकाचे हक्कांचे संरक्षण करण्यासाठी मुलभूत हक्कांमध्ये तरतुदी केल्या. तर काही सदस्यांनी आपला शेजारील देश अल्पसंख्यांकाच्या विषयी काय भूमिका घेतो. यावर आपण भूमिका घ्यावी अशी मते मांडली. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले कि, आपल्या देशामध्ये सर्वाना समान अधिकार आहे. कारण आपल्या देशात लोकशाही आहे. त्यामुळे लोकशाही मध्ये बहुसंख्यांकाची अल्पसंख्याकांवर हुकुमशाही निर्माण होऊ नये. त्यामुळे अल्पसंख्याकांच्या हक्कांची हमी दिली आहे. आपल्या संविधान कर्त्यांनी अल्पसंख्याका समुद्याला आपला धर्माचा स्वतंत्र बरोबर सांस्कृतिक, शैक्षणिक हक्क दिली. आपली भाषा, लिपी, सांस्कृतीचे संवर्धन करण्याची हमी दिली. कारण अल्पसंख्यांक समुद्याला वगळून भारत नावाच्या देशाची कल्पना करता येऊ शकत नाही. या देशाच्या स्वतंत्रलढा असो कि राष्ट्र उभारणी असो या मध्ये अल्पसंख्यांक समुद्याचे मोठे योगदान आहे.

८०- ९० च्या दशका मध्ये धर्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या विरोधात भूमिका घेण्यास सुरुवात झाली. मात्र समकालीन परीस्थीतीत मध्ये भाषिक, धर्मिक अल्पसंख्याकांचे प्रश्न वेगवेगळ्या कारणांनी संघर्षाचे विषय म्हणून राजकारणाच्या मध्यवर्ती आणले जात आहे. अलीकडच्या कालखंडात धर्मिक मुद्दे पुढे आणले जात आहे. हि भारतीय लोकशाही समोर गंभीर समस्या आहे. त्यामुळे भारताच्या एकात्मता, अखंडत्व, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय या तत्वावर पर्यायाने भारताच्या सार्वभौमत्वा समोर एक आव्हान उभे आहे. कारण एकात्मता हे तत्व भारतीयतत्वाचा मुळ गाभा आणि सत्व आहे. आज मताच्या स्वार्थी राजकारणाचा दृष्टीकोनातून पाहिले जाते. हिंदूराष्ट्र निर्मिती, लव्ह जिहाद, मॉबलिचिंग, हिजाब, वेशभूष, केशभूषा, तुम्ही काय करावे ? काय करू नये ? काय खावे? यासारखे मुद्दे उपस्थित केले जाता आहे. तर चिथावणीखोर भाषा हि सार्वजनिकरित्या लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून केली जाते. देशा मध्ये जाणीवपूर्वक नफरत आणि द्वेष पसरवण्याचे कार्य केले जाते. त्याला सत्ताधारी घटक पाठीशी घालतो. हे अतिशय गंभीर आहे. परंतु या देशाच्या संविधानावर विश्वास असलेला आणि आपल्या

सदसद्विवेकबुद्धी वागणारा प्रत्येक भारतीय नागरिक हा अशा परिस्थिती मध्ये संविधानाच्या मूल्यांच्या बाजूने उभा राहत आहे. हे देश मध्ये आशादायी चित्र आहे. त्यमुळे

अध्यक्षीय भाषणात डॉ. भगवान माळी सर यांनी आजच्या कार्यक्रमाची आवश्यकता विशद केली. भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करताना म्हणाले कि, भारतीय संविधान लिहिण्यासाठी दोन वर्ष आकरा महिने सतरा दिवस लागले. आपल्या संविधानाकर्त्यांनी संविधानाची निर्मिती प्रयत्न पूर्वक आणि दूरदृष्टीकोनातून केलेली आहे. भारतीय संविधान हे सर्वा समुहांना सामावून घेणारे आहे. भारतीय समाजाला संविधानाने समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय हि मूल्य दिली. हि सर्व मूल्य मानवतेची मूल्य आहे. त्यमुळे आज आपण सर्व एकत्र आहोत. संविधानाच्या उद्देशीपत्रिकेत आम्ही भारताचे लोक या शब्दाने सुरुवात जाणीव पूर्वक केलेली आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. कि, आपण अल्पसंख्याकाचे अधिकाराचे संरक्षण आणि संवर्धन केले पाहिजे.

या वेळी व्याख्यात्याचा परिचय व कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. विलास कर्डीले सर यांनी करून दिला. सूत्रसंचालन करिष्मा भोसले आणि तृप्ती जाधव या राष्ट्रीय सेवा योज नेच्या विद्यार्थीनी केले. तर आभार डॉ. निरंजन शहा सर यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा . प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर , उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर , डॉ. रामचंद्र सपकळ सर , उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम , उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम , महाविद्यालयाचे रजिस्टार श्री . अभिनंदन शहा सर यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले.

डॉ. विलास कर्डीले
राष्ट्रीय सेवा योजना

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

(स्वायत्त महाविद्यालय)

राष्ट्रीय सर्वा योजना, विद्यार्थी विकास मंडळ व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने

## *"राष्ट्रीय आल्पसंख्यांक दिन"*

व्याख्याते : प्रा. राजू पांडे (राज्यशास्त्र विभाग)

विषय : "भारतीय अल्पसंख्याकांचे हक्क आणि सध्यस्थिती"

**संयोजक**

मा. डॉ. विलास कर्डिले
राष्ट्रीय सेवा योजना
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

मा. डॉ. हनुमंत फाटक
राज्यशास्त्र विभागप्रमुख
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

मा. डॉ. भगवान माळी
विद्यार्थी विकास मंडळ
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

सोमवार दि.१९ डिसेंबर,२०२२.    स्थळ: प्रशासन सभागृह    वेळ: दु. ११:०० वा.